ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २४२ • बुधवार दि.२४ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

# पंजप्यारे साहेबांन यांची घोषणा: "नवीन गुरुद्वारा अधिनियम" ॲक्ट अमान्य

## गुरुद्वारा कायदा १९५६ योग्य असल्याचा निर्वाळा

नांदेड/प्रतिनिधी-राज्य सरकारने प्रस्तावित गुरुद्वारा सचखंड अधिनियम कायद्याला नांदेड मध्ये विरोध होत असून मंगळवारी सायंकाळी गुरुद्वारा तख्त सचखंड येथे आदरणीय पंजप्यारे साहिबान यांनी प्रस्तावित नवीन कायदा अमान्य असल्याची घोषणा केली आहे.

पंजप्यारे साहिबान यांच्या तर्फेसहायक जत्थेदार संतबाबा रामसिंघजी यांनी शिख समाजातील नागरिकांशी चर्चेनंतर भावना व्यक्त करत असल्याचे संगत जूना व प्रचलित कायदा १९५६ योग्य आहे. नवीन कायद्याची विशेषता अधिनियम सारखा कायदा नको असल्याचे सांगितले. पंजप्यारे साहिबान यांच्या घोषणेनंतर नांदेड नव्हे तर देशाविदेशातून शीख समाजाने शासन निर्णयास विरोध दर्शविन्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्र शासनाने एकतर्फा निर्णय घेऊ नये अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. तत्पूर्वी, मंगळवारी दुपारी गुरुद्वाराचे जत्थेदार संतबाबा कुलवंतसिंघजी आणी पंजप्यारे साहिबान यांची स्थानीक शीख समाजासोबत चर्चा झाली. यावेळी संतबाबा बलविंदरसिंघजी करसेवावाले यांची ही प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्व उपस्थितांनी नवीन गुरुद्वारा अधिनियम कायदा प्रस्तावाचे विरोध केले. तर वरील कायदा लागू होऊ नये म्हणून सर्व शीख समाजाने विरोध दर्शावा असे निश्चित झाले. बैठकीस मोठ्या संख्येत हजुरी सिख साधसंगतची उपस्थिती होती. राज्य सरकारच्या निर्णयाचे पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश येथील शीख समाजाने विरोध दर्शवत आपला पाठिंबा व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. अल्पसंख्यक शीख समाजाच्या एक उच्च धार्मिक संस्थेस महाराष्ट्र शासनाने वेठीस धरले असून मागील २५ वर्षापासून सतत प्रशासक नेमणे, शासन नियुक्त अध्यक्ष नेमणे सारखे प्रकार सुरु होते. त्यात आता नवीन कायदा लादून संस्थेचे व्यवस्थापन शासन आपल्या हाती करून घेत आहे असे चित्र निर्माण झाले आहे. येत्या तीन ते चार दिवसात विधानसभा सत्रात नवीन गुरुद्वारा अधिनियम कायदा मंजूरीसाठी ठेवला जाणार आहे. तेव्हा शीख समाजात मोठी अस्वस्थता निर्माण झालेली आहे. गुरुद्वारा बोर्ड ॲक्ट १९५६ बदलण्याच्या राज्य सरकारच्या निर्णया विषयी शिख समाजासह भाविकांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे. राज्य सरकारच्या प्रस्तावित गुरुद्वारा बोर्ड ॲक्ट विषयी नांदेडमधील लोकप्रतिनिधींनी अजूनही आपली भूमीका स्पष्ट केली नाही. सचखंड गुरुद्वाराच्या आदरणीय पंजप्यारे



साहिब यांनी गुरुद्वारा बोर्डाच्या नवीन प्रस्तावित कायद्या अमान्य असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे आता महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाला देशभरात विरोध केला जाणार आहे.

# तीर्थक्षेत्र माहूर अंधारात ; भाविकांची फरफट



## बाळाला कपड्याच्या पाळण्यात झोपविण्याची वेळ!

माहूर/प्रतिनिधी-राज्यभरातून लाखो भाविक श्रद्धेने येणाऱ्या तीर्थक्षेत्र माहूरमध्ये विजेचा सुरू असलेला लपंडाव आता असह्य बनला आहे. थोडासा वारा सुटला किंवा पावसाची एखादी सर आली की संपूर्ण माहूरची बत्ती गुल होणे हे नित्याचेच झाले आहे. यामुळे स्थानिक नागरिकांसह दर्शनासाठी आलेल्या भाविकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. अख्खा उन्हाळाभर महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांना वेठीस धरल्याची भावना निर्माण झाली आहे. दिवस-रात्र होणाऱ्या वीजखंडितीमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून तीर्थक्षेत्राची प्रतिमाही मलिन होत आहे.

या परिस्थितीचे भयावह वास्तव दाखवणारा एक धक्कादायक व्हिडिओ वायरल झाला आहे. काल मंगळवारी दर्शनासाठी आलेल्या एका कुटुंबाला वीज नसल्यामुळे आपल्या चिमुकल्या बाळाला झोपविण्यासाठी अक्षरशः कपड्याचा पाळणा तयार करावा लागला. बाळाची आई आणि आजी यांनी हातात कपडा धरून झोका तयार केला आणि त्या पान ४ वर

# स्मार्ट मिटरमुळे वीज दर कमी होतील

## मुख्यमंत्री फडणवीसांचा दावा



मुंबई/प्रतिनिधी-वीज मंडळाच्या स्मार्ट मीटरमुळे महाराष्ट्रातील वीजेचे दर गुजरातपेक्षाही कमी होतील, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत एका चर्चेदरम्यान केला.

राज्यातील स्मार्ट मीटर योजनेवरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत वीजदर आणि ग्रीड सपोर्ट शुल्काबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. आगामी काही वर्षांत महाराष्ट्रातील वीजदर गुजरातपेक्षाही कमी होतील आणि २०२९-३० पर्यंत राज्य देशातील सर्वात स्वस्त वीज पुरवणारे राज्य बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. काँग्रेसचे आ.सतेज पाटील यांनी सभागृहात वीजदरवाढ, ग्रीड सपोर्ट चार्जेस आणि स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित केले. ग्राहकांवर विविध शुल्कांचा अतिरिक्त भार पडत असल्याने सरकारने या विषयात हस्तक्षेप पान ४ वर




प्रभाग क्र.७ मधील डीआरडी कॉलनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर व लेबर कॉलनी परिसरात सुरळीत वीज पुरवठ्याची मोठी समस्या निर्माण झाली होती. या प्रकारामुळे नागरिकांची अडचण होत होती. अखेर नगरसेवक राहुल सोनसळे व नगरसेवक प्रतिनिधी रिजवान सय्यद यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या नवीन विद्युत डीपीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

# नरसी फाटा येथे पोलीसांच्या बंदोबस्तात अतिक्रमण हटविण्याची कारवाई

नायगाव/प्रतिनिधी-नरसी फाटा येथे वाढत्या अतिक्रमणामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याने रामतीर्थ पोलीसांनी अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेतली आहे. आज रामतीर्थ पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या कडक बंदोबस्तात अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू करण्यात आली.




मागील वर्षी तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी नरसी फाटा परिसरातील मोठ्या प्रमाणातील अतिक्रमण हटविण्याची धडक कारवाई केली होती. त्यानंतर त्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा नरसी फाटा येथे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले आणि मुख्य रस्त्यावर वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ लागली. या पार्श्वभूमीवर प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे पाटील यांनी गेल्या महिनाभरापासून अतिक्रमण धारकांना वारंवार सूचना देत स्वखर्चाने अतिक्रमण हटविण्याचे आवाहन केले होते. मात्र काहींनी या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याने अखेर आज (बुधवार) सकाळी प्रशासनाने प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात केली. नरसी-मुखेड, नरसी-देगलूर, नरसी-नायगाव व नरसी-बिलोली या चारही रस्त्यावरील पान ४ वर

# ज्वारी पेराच नाही,तरी नोंदणी झाली; खरेदी केंद्रातील गैरव्यवहारांवर प्रश्नचिन्ह

किनवट/प्रतिनिधी-ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांपेक्षा ज्यांच्या शेतात ज्वारीचा पेरा केलेला नाही परंतु ऑनलाईन नोंदणी केलेल्यांच्या नावाआडून व्यापाऱ्यांच्या ज्वारी विक्रीचा मार्ग मोकळा झाला आहे. कमीशनखोरीमुळे बोगस ऑनलाईन नोंदणी केलेल्या व्यापारीधार्जीण्यांचे आणि व्यापाऱ्यांचे भरडधान्य खरेदी केले जाणार आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या वतीने चालू असलेल्या ज्वारी आणि मका खरेदीची मुदत ३० जून रोजी संपणार असल्याने उर्वरित भरडधान्य खरेदी करण्यासाठी ३१ जुलै पर्यंतच्या मुदत वाढीची मागणी करण्यात आली आहे. या मुदतवाढीचा फायदा हा व्यापाऱ्यांनाच होण्याची शक्यता व्यक्तविली जात आहे.

ज्वारीचा पेरा नसतानाही ज्वारी असल्याची बतावणी करून आधार भूत हमी भाव योजनेचा लाभ घेण्यासाठी काही व्यापाऱ्यांनी आणि व्यापारी धार्जिण्यांनी ऑनलाईन नोंदणी केली. यात आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक किनवट कार्यालयातील भ्रष्ट यंत्रणेनेचा महत्त्वाचा वाटा आहे. यावरून शेतकरी कमालीचा आक्रमक झाला होता. त्यावेळी बोगस नोंदणी केलेल्यांची नावे वगळण्याचे प्रशासनाने आश्वासन दिले होते. परंतु कालांतराने कुठे पाणी मुरले थांग पत्ता नाही. मात्र सद्यस्थितीत मात्र कमीशनखोरीने पाय मजबूत रोवल्याने व्यापाऱ्यांच्या ज्वारी आणि मका विक्रीचा रस्ताच खुल्ला करून दिला असून आज त्यावर रोखथाम करायला कोणीही रस्त्यावर उतरायला तयार नाहीत, याबद्दल सर्वत्र उलटसुलट चर्चांना उधाण आल्याचे ऐकायला मिळते. ३० जून २०२६ पर्यंतच आदिवासी विकास महामंडळाची खरेदी केंद्रं चालू असतील असे स्थानिक उपप्रादेशिक व्यवस्थापक प्रफुल्ल सोयाम यांनी सुरुवातीला जाहीर केले होते. १ मे पासून भरडधान्य खरेदीला सुरुवात केली होती. मध्येच गोडाऊन उपलब्ध नसल्याने आणि अन्य कारणास्तव चालू असलेली खरेदी केंद्र बंद पाडल्याने त्यात जवळजवळ एक आठवडा वाया गेला. गोदाम उपलब्ध झाल्याने पुन्हा खरेदीला सुरुवात झाली. त्याच धांदलघाईचा कमीशनखोरांना फायदा उठवता आल्याच्याही चर्चा ऐकायला मिळताहेत. आता ३१ जुलै पर्यंत भरडधान्य खरेदीला मुदतवाढ देण्याची भाजपा किसान मोर्चा आणि शेतकरी संघटना मागणी करतेय. बहूतांश शेतकऱ्यांनी पडत्या दराने ज्वारी व्यापाऱ्यांच्या माथी मारलीय. आज जेमतेम शेतकऱ्यांकडे ज्वारी असू शकते. यापुढे खरेदी केंद्र चालू ठेवण्यासाठी मिळणाऱ्या मुदतवाढीचा फायदा व्यापाऱ्यांना मिळणार असल्याचेही ऐकायला मिळत आहे.

# केंद्रीय मंत्रिमंडळात फेररचनाचे संकेत

## पंतप्रधान मोदींची राष्ट्रपतींशी भेट;नव्या खासदारांना मंत्रीपदाची संधी?

नवी दिल्ली:पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची घेतलेली भेट आणि त्यानंतर आज होणारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक यामुळे राजधानीतील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळात लवकरच फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, विरोधी पक्षांतून एनडीएमध्ये दाखल झालेल्या काही खासदारांना मंत्रिपदाची संधी मिळू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

केंद्रीय राज्यमंत्री जॉर्ज कुरियन यांनी राज्यसभेचा कार्यकाळ संपल्यानंतर आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. अल्पसंख्याक व्यवहार तसेच मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय खात्याचे राज्यमंत्री म्हणून ते कार्यरत होते. भाजपने त्यांना राज्यसभेसाठी पुन्हा उमेदवारी न दिल्याने त्यांनी पदाचा राजीनामा सादर केला असून राष्ट्रपतींनी तो स्वीकारला आहे.दरम्यान, केंद्रीय मंत्री रवनीत सिंग बिट्टू यांनाही राज्यसभेसाठी पुन्हा उमेदवारी देण्यात आलेली नाही. त्यांचा कार्यकाळ संपला असला तरी घटनात्मक तरतुदींनुसार ते पुढील सहा महिने मंत्रीपदावर राहू शकतात. आगामी पंजाब विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बिट्टू राज्याच्या राजकारणात अधिक सक्रिय भूमिका बजावण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

भाजपच्या एक व्यक्ती, एक पद या सूत्राचाही संभाव्य फेरबदलावर परिणाम होऊ शकतो. दिल्ली भाजप अध्यक्षपदी नियुक्त झालेले केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा तसेच उत्तर प्रदेश भाजपचे अध्यक्ष आणि केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्याबाबतही विविध चर्चा सुरू आहेत. संघटनात्मक जबाबदाऱ्या आणि मंत्रीपद पान ४ वर

# लहरी मान्सून आणि बळीराजाची सत्त्वपरीक्षा

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या कृषी क्षेत्राचे भवितव्य दरवर्षी एकाच घटकावर अवलंबून असते, तो म्हणजे मान्सून. यंदाही जून महिना संपत आला, तरी पावसाची जी दमदार सुरुवात व्हायला हवी होती, ती झालेली नाही. देशाच्या, विशेषतः महाराष्ट्राच्या अनेक भागांत पावसाने दिलेली ओढ आणि काही ठिकाणी झालेली अनपेक्षित अतिवृष्टी यामुळे शेतकरी पुन्हा एकदा चिंतेच्या गर्तेत सापडला आहे. 'आभाळाकडे डोळे लावून बसलेला बळीराजा' हे चित्र आपल्याकडे नवे नाही, पण दरवर्षी बदलणाऱ्या हवामान चक्रामुळे या चित्रातील दाहकता अधिकच वाढत चालली आहे. हवामान खात्याचे अंदाज आणि प्रत्यक्ष निसर्गाचा खेळ यात ताळमेळ बसवणे आता कठीण झाले असून, या लहरीपणाचा थेट फटका खरीप हंगामाला बसताना दिसत आहे. जून महिन्याच्या सुरुवातीला मान्सून वेळेवर दाखल होणार असल्याच्या घोषणा झाल्या की, बळीराजा वर्षभराची चिंता विसरून शेतीच्या कामाला लागतो. कर्ज काढून, दागिने गहाण ठेवून किंवा उसनवारी करून बियाणे आणि खतांची खरेदी केली जाते. यंदाही शेतकऱ्यांनी तीच तयारी केली; मात्र पावसाने हुलकावणी दिल्याने लाखो हेक्टरवरील पेरण्या रखडल्या आहेत. ज्या भागात सुरुवातीच्या किरकोळ पावसावर घाईघाईने पेरण्या झाल्या, तिथे आता दुबार पेरणीचे संकट घोंगावत आहे. दुबार पेरणी म्हणजे शेतकऱ्याच्या अंगावर कर्जाचा दुप्पट बोजा. एका बाजूला पावसाची ही ओढ तर दुसऱ्या बाजूला काही जिल्ह्यांत अवघ्या काही तासांत ढगफुटी सदृश पाऊस होऊन पिके वाहून गेल्याच्या घटना घडल्या आहेत. निसर्गाचा हा 'कधी कोरडा, तर कधी ओला' दुष्काळ शेतकऱ्याचे कंबरडे मोडणारा ठरत आहे.या संपूर्ण परिस्थितीकडे केवळ 'निसर्गाचा कोप' म्हणून पाहून चालणार नाही. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाचे संकट आता आपल्या उंबरठ्यावरून थेट शेतामध्ये येऊन पोहोचले आहे. पावसाचे दिवस कमी होणे, पण पडताना तो अत्यंत तीव्र गतीने पडणे, हे या हवामान बदलाचे मुख्य लक्षण आहे. दुर्दैवाने, आपली शासकीय यंत्रणा आणि कृषी संशोधन संस्था या आव्हानाचा सामना करण्यासाठी अजूनही जुन्याच चौकटीत काम करताना दिसतात. हवामान खात्याचे अंदाज अधिक अचूक आणि प्रादेशिक पातळीवर तंतोतंत कसे होतील, यावर युद्धपातळीवर काम होण्याची गरज आहे. केवळ 'पाऊस पडेल' एवढाच अंदाज न देता, 'कोणत्या तालुक्यात कधी आणि किती पडेल', याचे अचूक गणित शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले, तरच त्याचे नुकसान टाळता येऊ शकते.पावसाच्या या लहरीपणामुळे केवळ अन्न धान्य उत्पादन घटत नाही, तर त्याचे दूरगामी परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतात. खरिपाचे उत्पन्न बुडाले की ग्रामीण भागातील क्रयशक्ती (खरेदी क्षमता) संपते, ज्याचा थेट फटका बाजारपेठेला बसतो. अन्न धान्याची टंचाई निर्माण होऊन महागाई वाढते. म्हणूनच, या संकटाच्या काळात सरकारने केवळ कागदी घोषणा न करता जमिनीवर उतरून काम करणे गरजेचे आहे. सर्वात आधी, ज्या शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे, त्यांना मोफत किंवा सवलतीच्या दरात बियाणे आणि खतांचा पुरवठा तातडीने केला पाहिजे. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी वातानुकूलित कार्यालयातून बाहेर पडून थेट बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे की, कमी पाण्यात किंवा उशिरा पेरणीसाठी कोणती पर्यायी पिके घ्यावीत. यासोबतच, 'पिक विमा' योजनेचा बोजवारा दरवर्षी उडताना दिसतो. शेतकरी विम्याचे हप्ते भरतात, पण जेव्हा अस्मानी संकटामुळे पिकांचे नुकसान होते, तेव्हा विम्याच्या कंपन्या नियमांचे तांत्रिक निकष लावून भरपाई देण्यास टाळाटाळ करतात. हा प्रकार थांबायला हवा. सरकारने विमा कंपन्यांना कडक ताकीद देऊन, पंचनाम्यांची प्रक्रिया सुटसुटीत करून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत जमा होईल, अशी व्यवस्था करावी. दीर्घकालीन उपायांचा विचार केला तर, आता आपल्याला 'हवामानस्नेही शेती' कडे वळावेच लागेल. पारंपरिक पिकांच्या रचनेत बदल करून, कमी पाण्यात आणि लहरी हवामानात तग धरू शकतील अशा बियाण्यांचे संशोधन वाढवावे लागेल. जलसंधारणाची कामे केवळ पावसाळ्यापूर्वीचे सोपस्कार न राहता, ती लोकचळवळ झाली पाहिजे, जेणेकरून पडणाऱ्या पावसाचा थेंब न थेंब जमिनीत मुरेल. बळीराजा हा केवळ अन्नदाता नाही, तर तो या देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया आहे. तो संकटात असेल तर देश सुखी राहू शकत नाही. निसर्गाचा लहरीपणा आपल्या हातात नसला, तरी त्यापासून शेतकऱ्याला वाचवणे आणि त्याला धीर देणे नक्कीच सरकारच्या आणि समाजाच्या हातात आहे. यंदाचा मान्सून बळीराजाची सत्त्वपरीक्षा पाहत आहे, अशा वेळी सरकारने खंबीरपणे त्याच्या पाठीशी उभे राहून त्याला या संकटातून बाहेर काढणे, हेच राजधर्माचे पहिले कर्तव्य ठरेल.

# सत्ताधारी पक्ष एकनिष्ठ आणि स्वच्छ विचारसरणीचे ; मग फोडाफोडीचे राजकारण कशाला ?




सध्याच्या परिस्थितीत देशासह राज्यात पक्ष फोडा आणि राज करा असा फार्मुला सुरू झालेला दिसून येतो.कारण पुढील संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ८५० खासदारांच्या विधेयकाला मंजुरी मिळावी यासाठी राज्यसभेत व लोकसभेत खासदारांची संख्या अपुरी पडत आहे. याच उद्देशाने सरकारने पक्ष फोडा आणि राज करा अशी रणनीती आखल्याचे स्पष्ट दिसून येते. कारण सरकारला कल्पना आहे की, देशातील ७५ टक्के पेक्षा जास्त लोकप्रतिनिधीवर भ्रष्टाचाराचे किंवा अन्य गुन्हेगारीच्या आरोपाने लिप्त आहेत. अशा सर्वच खासदारांवर सरकारची नजर आहे. अशा खासदारांना ईडी किंवा अन्य सरकारी यंत्रणेचा धाक दाखवून सत्ताधारी पक्ष आपल्या पक्षात किंवा वेगळा गट तयार करून प्रत्येक विरोधी पक्षात फूट पाडण्याचे दबावतंत्र सुरू आहे आणि हे काम सक्सेस सुध्दा होत आहे. त्याचप्रमाणे पक्ष सोडणारे लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी म्हणतात की आम्ही सत्तेत नसल्याने सरकार आमच्या क्षेत्राचा फंड पुरेसा देत नाही त्यामुळे आम्ही सत्ताधारी पक्षात किंवा एनडीएमध्ये किंवा महायुतीत प्रवेश केला आहे किंवा करीत आहोत. काही लोकप्रतिनिधींजवळ भ्रष्टाचाराच्या माध्यमातून वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आहे. त्यावर कोणतीही कारवाई होवू नये म्हणून एनडीए मध्ये किंवा महायुतीत प्रवेश केल्याचे दिसून येते आणि काही लोकप्रतिनिधी करोडोंची देवाण-घेवाण करून सत्तेकडे वळतांना दिसतात.

देशाच्या १४० कोटी जनतेला चांगल्याप्रकारे ही बाब ग्यात आहे. त्याचप्रमाणे अनेक लोकप्रतिनिधीं स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षांतर करून नैतिकता, बांधीलकी आणि पक्षाबद्दलची निष्ठा गहाण ठेवून सत्तेकडे वळल्याचे दिसून येते आणि एनडीएमध्ये किंवा महायुतीत फुटुन जाणारे ७५ टक्के लोकप्रतिनिधी हे कॉंग्रेसच्या विचारसरणीचे आहेत, कॉंग्रेसची विचारसरणी एनडीएला किंवा भाजपाला कधीच पटली नाही मग सरकारने या ७५ टक्के लोकप्रतिनिधींना आपल्या जवळ का केले असाही प्रश्न उपस्थित होतो! भाजपा पुर्वीही कॉंग्रेसला वाईट समजायची आणि आजही समजते एवढे सर्व असतांना फोडाफोडीचे राजकारण करून सरकारला कॉंग्रेस विचारसरणीचे लोक कसे काय चालतात? आजही सरकार महत्वाचे मुद्दे बाजूला सारून नेहरू-गांधी यांच्यावर चिखलफेक करून वारंवार देशातील जनतेला सांगतात की कॉंग्रेसने गेल्या ६० वर्षांत काहीच केले नाही ही बाब कितपत योग्य म्हणावी! देशाने पक्ष-विपक्षाचा काळ पहाला यात अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, व्ही.पी. सिंह, पी.व्ही.नरसिंहराव, मनमोहनसिंग, चंद्रशेखर, राजीव गांधी इत्यादी अनेक विभुतींच्या काळात पक्ष-विपक्ष सामंजस्याने कार्य करायचे व एकमेकांचे आचार-विचार आदानप्रदान करायचे. परंतु सध्याच्या परिस्थितीत सरकार विरोधकांच्या कोणत्याही बाबी ऐकण्यास तयार नसल्याचे दिसून येते.

ही लोकशाहीला दृष्टीकोणातुन धोक्याची घंटा म्हणावी लागेल. कारण विरोधी पक्ष फुटुन एनडीएमध्ये गेला ते सरकारला चालते आणि दुधासारखे स्वच्छ होतात. परंतु विरोधकांनी उचलले प्रश्न चालत नाही ही कसली लोकशाही म्हणावी! ही अत्यंत गंभीर बाब म्हणावी लागेल. पुर्वी रेल्वे, विमान वाहतूक, संरक्षण, अर्थ ,इत्यादी अनेक खात्यातमध्ये जर काही चुकीच्या घटना घडल्या किंवा दुर्घटना झाल्या तर संबंधित विभागाचे मंत्री नैतिक जबाबदारी स्वीकारून स्वतःहुन राजीनामा द्यायचे किंवा जनतेचा रोष पाहुन राजीनामा द्यायचे. परंतु सध्याच्या परिस्थितीत देशात नीट पेपर लिक प्रकरण मोठ्या प्रमाणात गाजले यात आतापर्यंत अंदाजे २० पेक्षा जास्त विद्यार्थींनी आत्महत्या केल्या तरीही शिक्षण मंत्र्यांनी आपली नैतिक जबाबदारी स्वीकारून अजुनपर्यंत राजीनामा दिलेला नाही. सरकारचे म्हणने आहे की, राजीनामा ही पद्धत आमच्यात नाही ही कसली लोकशाही! सोन्याचे भाव आसमानाला टेकले, महागाईने अक्राळविक्राळ रूप धारण केले, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही, आरोग्य सुविधा दिवसेंदिवस ढासळत आहे. ह्या सर्वच महत्वपूर्ण गोष्टी सरकारच्या डोळ्यासमोर आहे. परंतु यावरून लक्ष भटकवीण्यासाठी देशात मंदिर-मज्जीद, हिंदू-मूस्लीम वाद समोर करून १४० कोटी जनतेची सरकार दिशाभूल करीत असल्याचे दिसून येते. आणि ही सत्य परिस्थिती आहे.

**रमेश लांजेवार**
नागपूर

देशात अनेक ज्वलंत व गंभीर समस्या आहेत बेरोजगारी, कुमोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शैक्षणिक समस्या,वाढता भ्रष्टाचार, अत्याचार, वाढत्या जंगलतोडीमुळे अलनिनोची गंभीर समस्या,पिण्याच्या पाण्याची समस्या, आरोग्य, करोडोंचे घोटाळे करून अनेक पुंजीपतीनी विदेशात पलायन केले त्याकडे सरकारचे दुर्लक्ष आहे. अशा अनेक गंभीर समस्या १४० कोटी जनतेपुढे उभ्या आहेत.तरीही देशाच्या भोळ्याभाबड्या जनतेला मंदिर-मज्जीद नावाचे भुत घालून या सर्वच समस्या बाजूला सारून सत्तेत आपली पकड मजबूत करण्यासाठी देशात सरकारकडून फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे. सरकारची कट्टर विरोधक ममता बॅनर्जी त्यांच्या पक्षाचे आचार-विचार सरकारला कधीच पटले नाही; परंतु फोडाफोडीच्या राजकारणातुन काही लोकप्रतिनिधी (खासदार) आपल्याकडे करून घेतले ते सरकारला १०० टक्के चालले ही कुठली नितीमत्ता म्हणावी! सध्याच्या परिस्थितीत देशात खुला राजकीय बाजार मांडल्याचा दिसून येतो.

जनुकाय लोकशाही संपुष्टात आली की काय असे चित्र दिसत आहे. कारण सत्तेच्या लोभापोटी अनेक दिग्गज लोकप्रतिनिधी पक्षांतर करून सत्तेकडे वळतांना दिसतात म्हणजेच विकल्या जात आहे ह्या सर्वच बाबी लोकप्रतिनिधींकडुन कलंकित करणाऱ्या आहेत. एकेकाळी प्रत्येक राजकीय पक्षांमध्ये विचारसरणी, पक्षांची बांधीलकी, पक्षासोबत एकनिष्ठपणा रहायची परंतु अलीकडच्या काळात राजकीय वर्तुळात घोडेबाजाराला मोठा ऊत आल्याचे स्पष्ट दिसून येते. लोकप्रतिनिधी सरेआम विकल्या जात आहे आणि जो सत्ताधारी पक्ष ज्या विरोधकांवर भ्रष्टाचाराचे मोठमोठे आरोप लावायचे आणि जेलमध्ये टाकण्याची भाषा करायचे त्या सर्वांनाच सरकार भ्रष्टाचाराबद्दलची क्लीन चिट देवून आपल्या पक्षात सहभागी करून घेत आहेत ही तर लोकशाहीची खुली थट्टा म्हणावी लागेल. आचार-विचारामध्ये विरोधाभास असु शकतो आणि असायला पाहिजे.परंतु १४० कोटी जनतेसमोर धडाल लोकप्रतिनिधी विकल्या जात आहे ही १४० कोटी जनतेची थट्टाच म्हणावी लागेल.

आजचा राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षाची नैतिकता, बांधीलकी, विचारसरणी विसरून सत्तेकडे पलायन करीत आहे हा लोकशाहीला मोठा धक्काच म्हणावा लागेल. सत्ताधारी पक्षाने आपली पकड मजबूत करण्यासाठी जनुकाय लोकशाही विरूद्ध बंड पुकारले की काय असे वाटत आहे. कारण सध्याच्या सत्ताधाऱ्यांना विरोधकांची विचारसरणी कधीच पटली नाही आणि पटणार सुध्दा नाही.कारण सरकारला मजबूत विरोधी पक्ष नकोच! याकरिता विरोधीपक्ष संपुष्टात आणण्यासाठी सरकारने फोडाफोडीचे राजकारण सुरू केले आहे आणि त्याच पध्दतीने सरकारकडून गेल्या काही वर्षांपासून देशात फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे आणि यात त्यांना मोठ्या प्रमाणात यश सुध्दा मिळत आहे. यामागचा सरकारचा एकच उद्देश असावा तो म्हणजे विरोधक संपुष्टात आणने. गेल्या १२ वर्षे अगोदर विरोधकांचा मानसन्मान व्हायचा. परंतु आता तोडा-फोडा राज करा अशी परिस्थिती सर्वत्र दिसून येत आहे. आज देशात सत्ताधाऱ्यांसोबत शेकडो भ्रष्टाचारी आहेत. एकेकाळी सत्ताधारी पक्ष ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप लावायचे तेच भ्रष्टाचारी आज सत्तेत सहभागी होवून जबाबदार पदावर विराजमान आहेत आणि दुधासारखे स्वच्छ झालेले दिसतात याला कोणती लोकशाही म्हणावी! जय हिंद.

# कट्टर राजकीय विरोधक आता एकाच पक्षात

## खा.नागेश पाटील आष्टीकर आणि आ.बाबूराव कदम कोहळीकर यांची 'राजकीय केमिस्ट्री' कशी जुळणार?

**शेख चांदपाशा**

हदगाव- हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी मी शिवसेनेच्या (शिंदे गट) जाणार नाही असा भपंक दावा केला होता. नुकताच केलेल्या राजकीय पक्षांतरामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. मात्र, या पक्षांतराचा सर्वाधिक परिणाम आणि चर्चा हदगाव विधानसभा मतदारसंघात होताना दिसत आहे. कारण, अनेक वर्षांपासून कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून ओळखले जाणारे खा.आष्टीकर आणि विद्यमान आ. बाबूराव कदम कोहळीकर आता एकाच पक्षात आले आहेत. त्यामुळे हे दोन्ही मातब्बर नेते एकत्र कसे काम करणार? हा प्रश्न जनतेसह राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे.

राजकारणात कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात, असे म्हटले जाते. हदगाव विधानसभा क्षेत्राच्या राजकारणात याची पुन्हा एकदा प्रचिती येत असल्याची भावना व्यक्त होत आहे. आगामी काळात हे दोन्ही नेते पक्षहितासाठी जुने मतभेद विसरून एकत्र काम करतील की अंतर्गत वर्चस्वासाठी नवा संघर्ष उभा राहील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





### सरपंचपदा पासून संसदेपर्यंतचा प्रवास

हदगाव तालुक्यातील आष्टी हे खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे मूळ गाव. त्यांचे वडील स्वर्गीय बापूराव पाटील आष्टीकर हे हदगाव मतदारसंघाचे दोन वेळा आमदार होते. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे संस्थापक शरद पवार यांचे ते निकटवर्तीय मानले जात असल्याने राजकारणाचे बाळकडू नागेश पाटील आष्टीकर यांना घरातूनच मिळाले.

मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व यामुळे त्यांनी स्थानिक राजकारणात वेगळी ओळख निर्माण केली. सन २००० ते २००५ या कालावधीत त्यांनी आष्टी ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून काम पाहिले. त्यानंतर जिल्हा परिषद निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागला. मात्र, त्यांनी खचून न जाता सहकार क्षेत्रात सक्रिय भूमिका घेतली. ते २०१३ या काळात ते हदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राहिले. तसेच पुणे पणन महासंघाचे संचालक आणि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. २०१० ते २०१४ या कालावधीत शिवसेनेचे तालुकाप्रमुख म्हणून त्यांनी संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न २०१४ मध्ये शिवसेनेच्या तिकिटावर ते हदगाव विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. मात्र, २०१९ मध्ये कॉंग्रेसचे माधवराव पाटील जवळगावकर यांनी त्यांचा पराभव केला. त्यानंतरही त्यांनी राजकीय सक्रियता कायम ठेवली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून त्यांनी हिंगोली लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवला. त्यावेळी देशभरात भाजपच्या बाजूने वातावरण असतानाही त्यांनी विजय संपादन केल्याने त्यांची राजकीय ताकद अधोरेखित झाली. पक्षांतराच्या चर्चांना अखेर पूर्णविराम खासदार झाल्यानंतर संसदेतील काही महत्त्वाच्या चर्चां दरम्यान त्यांची अनुपस्थिती, काही राष्ट्रीय मुद्द्यांवर त्यांनी घेतलेली संयमी भूमिका सत्ताधारी पक्षाला अनुकूल असे त्यांचे वागणूक केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी वाढलेला संपर्क आणि स्थानिक कार्यकर्त्यांशी निर्माण झालेले अंतर यामुळे त्यांच्या पक्षांतराच्या चर्चा रंगू लागल्या होत्या. शेवटपर्यंत ते उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याचे बोलले जात असतानाच त्यांनी अखेर शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. त्यांच्या या निर्णयामुळे राजकीय तर्क-वितर्कांना पूर्णविराम मिळाला असला, तरी समर्थकांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. राजकारणात काहीही अशक्य नसते याची पुन्हा प्रचिती झाली आहे. लोकसभा निवडणुकीत खा.नागेश पाटील आष्टीकर यांच्या प्रचारासाठी त्यांचे पूर्वीचे प्रतिस्पर्धी माजी आ माधवराव पा. जवळगावकर मैदानात उतरले होते. त्या वेळी राजकीय समीकरणांनी अनेकांना आश्चर्यचकित केले होते. आता पुन्हा एकदा तसाच राजकीय प्रयोग हदगाव विधानसभा क्षेत्रामध्ये पाहायला मिळणार का? कट्टर विरोधक असलेले आ. बाबूराव कदम कोहळीकर आणि खा. नागेश पाटील आष्टीकर पक्षाच्या आदेशा नुसार एकत्र काम करणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुका तोंडावर आहेत. अशा परिस्थितीत जागावाटप, नेतृत्व, पक्षसंघटना आणि स्थानिक राजकारणाची सूत्रे कोणाच्या हाती राहणार, हा मोठा प्रश्न आहे. तसेच दोन्ही नेत्यांचे कार्यकर्ते हे नवे राजकीय समीकरण कितपत स्वीकारतील, याकडेही लक्ष लागले आहे. पक्षांतर्गत समन्वय साधत विकासाला प्राधान्य दिले जाणार की वर्चस्वाच्या राजकारणामुळे नवे संघर्ष उभे राहणार, याचे उत्तर येणारा काळच देणार आहे. हदगाव तालुक्याच्या आष्टी गावच्या सरपंच पदापासून दिल्लीच्या संसद भवनापर्यंत राजकीय प्रवास करणारे खा. नागेश पाटील आष्टीकर आता नव्या राजकीय टप्प्यात प्रवेश करत आहेत. दुसरीकडे हदगाव विधान सभा क्षेत्राचे आ. बाबूराव कदम कोहळीकर यांच्या सोबत त्यांची राजकीय जुळवाजुळव कशी होते, यावर हदगाव विधानसभा मतदार संघाच्या भविष्यातील राजकीय दिशा मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे. कट्टर विरोधकां पासून पक्ष सहकाऱ्यांपर्यंतचा हा प्रवास हदगाव तालुक्याच्या राजकारणाला नवे वळण देणार की नवा संघर्ष निर्माण करणार, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### विकासाला गती की अंतर्गत वर्चस्वाची स्पर्धा?

हदगाव आणि हिमायतनगर तालुक्याच्या विकासासाठी सध्या अनुकूल राजकीय परिस्थिती निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. एकाच पक्षात आमदार आणि खासदार असल्याने विकासकामांना गती मिळू शकते, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. मात्र, दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांमध्ये एक वेगळीच भावना आहे. निवडणुकीच्या काळात विकासाची आश्वासने दिली जातात; परंतु प्रत्यक्षात सामान्य कार्यकर्ते आणि नागरिकांची परिस्थिती मात्र 'जैसे थे'च राहते. अनेकदा लोकप्रतिनिधींच्या जवळील काही मोजक्याच व्यक्तींना अधिक महत्त्व मिळते, अशीही चर्चा स्थानिक पातळीवर ऐकायला मिळते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# मृगातील बेडूक 'लबाड' निघाले अर्धरात 'गाढव' घेऊन येणार काय पाऊस ?

देगलूर/प्रतिनिधी-यंदा नक्षत्राचं वाहन 'बेडूक' आहे. पाऊस पडणाऱ्या आशेवर शेतकरी राजा चातकासारखी पावसाची वाट पाहत होता. शेत नांगरणी, वखरणी, पदर मोड करून महागडी बियाणे आणून ठेवली. पण झालं उलटच मृगाच्या बेडकाने अशी काही कोलांटीउडी मारली की, मृग नक्षत्र संपायला आला तरी आभाळ कोरडेच आहे. मृगाचा बेडूक पुरता लबाड निघाल्याने आता २२ जून पासून सुरू झालेल्या अर्धरा नक्षत्राच्या 'गाढव' वाहनाकडून शेतकऱ्यांना पावसाची आशा आहे. जून महिना आता मावळतीला आला आहे. मात्र देगलूर तालुक्यातील नदी, नाले, वडे आणि तलाव अजूनही कोरडे पडले आहेत.

देगलूर तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र हे नांदेड जिल्ह्यात सर्वात जास्त हेक्टर लागवड लायक क्षेत्र आहे. सध्याच्या पेरण्या शून्य असून शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. २५ मे रोजी 'रोहिणी' नक्षत्राची सुरुवात झाली. वादळी वाऱ्यासह आलेल्या पूर्व माध्यमिक पावसाने काही ठिकाणी हजेरी लावली, पण तो पाऊस पिकापेक्षा शेतीचे नुकसानच जास्त करून गेला. खरी अपेक्षा कोणती ती पेरणीसाठी महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या 'मृग' नक्षत्राची मात्र, यंदा मृगाच्या पावसाने दगा दिला. देगलूर तालुक्यात पाऊस झाला नसल्याने पेरण्या पूर्णपणे खोळंबल्या आहेत. लग्न सराई संपून आता २२ जून रोजी दुपारी अर्धरा नक्षत्र सुरू झाले आहे. यांना अर्धरा नक्षत्राचे वाहन 'गाढव' आहे. पंचांगाच्या संकेतानुसार या नक्षत्राच्या पूर्वार्धात चांगला पाऊस होईल, पण उत्तरार्धात पावसाचा खंड पडण्याची शक्यता आहे. म्हणजेच कसा बसा पाऊस पडून पेरणी झाली तरी पुढे पावसाने दडी मारल्यास दुबार पेरणीची संकट वाढू शकते अशी भीती आता शेतकऱ्यांना सतावत आहे. वेगवेगळ्या संकटामुळे आधीच मेटाकोटीस आले त्या शेतकऱ्यांची एल निनो ने झोप उडवली आहे. खरीप हंगामात कोणते पीक घ्यायची याचे नियोजन आलीच ठरवून शेतकऱ्यांनी त्याप्रमाणे शेतातील सरी, पिकांची निवड आदीचे नियोजन केले होते. परंतु, अचानक एल निनो चे संकट आल्याने शेतकरी धास्तावला आहे.

### पेरणीसाठी घाई नको पाऊस पडू द्या

मागच्या वर्षी पाऊस समाधानकारक होता, नदी नाले भरून वाहिले होते. पहिल्यांदा हवामान लहरी झाला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी अजिबात घाई गडबड करू नये जोपर्यंत जमिनीत पुरेशी ओल होत नाही., तोपर्यंत बियाणे मातीत टाकू नका.

**-एम.जी.सोनकांबळे** प्रभारी तालुका कृषी अधिकारी देगलूर

# मराठवाडा जनता विकास परिषदेचे २८ रोजी भोकर येथे जिल्हा अधिवेशन

नांदेड/प्रतिनिधी-मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने लोकशाही मार्गाने लढा देणाऱ्या मराठवाडा जनता विकास परिषदच्या नांदेड जिल्हा शाखेचे जिल्हास्तरीय अधिवेशन रविवार, २८ जून रोजी भोकर तालुक्यातील सीताखंडी येथील आनंदधाम येथे आयोजित करण्यात आले आहे.

मराठवाडा जनता विकास परिषद ही स्वातंत्र्योत्तर काळापासून मराठवाडा विभागाच्या विकासासाठी कार्यरत असलेली महत्त्वाची संघटना आहे. संघटनेच्या केंद्रीय कार्यकारिणीने प्रत्येक जिल्ह्यातील विकासाशी संबंधित प्रश्नांवर स्थानिक पातळीवर चर्चा घडवून आणून शासनाकडे प्रभावी पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या अधिवेशनाला मराठवाडा जनता विकास परिषद, औरंगाबादचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, सचिव प्रा. अर्जुन जाधव, माजी अध्यक्ष तथा खा.डॉ. व्यंकटेश काबदे, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील, दैनिक प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनात जिल्ह्याच्या विकासाशी निगडित पायाभूत सुविधा, शिक्षण, सिंचन, उद्योग, रोजगार आणि सामाजिक विकास अशा विविध विषयांवर चर्चा अपेक्षित आहे.जिल्ह्यातील पदाधिकारी, सदस्य आणि विकासप्रेमी नागरिकांनी अधिवेशनात उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. बालाजी कोम्पलवार, उपाध्यक्ष भाऊराव मोरे व गोविंदराव पाटील सिंधीकर, सचिव संभाजी शिंदे, केंद्रीय खजिनदार प्रा. डॉ. अशोक सिद्धेवाड, जिल्हा कोषाध्यक्ष प्रभाकर लखे, विश्वंभर पवार, श्रीनिवास शिंदे, पत्रकार विठ्ठल फुलारी यांनी केले आहे.



भाजपच्या योग सप्ताहानिमित्त धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या २७ व्या भव्य चालण्याच्या स्पर्धेचे उद्घाटन माजी मंत्री डी.पी.सावंत व महापौर कविता मुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

# लिंबोटी धरणात पाणी तातडीने सोडून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा

## माजी आ.शंकरअण्णा धोंडगे यांची मागणी

कंधार/प्रतिनिधी-जून महिना संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने लोहा व कंधार तालुक्यातील शेतकरी संकटात सापडले आहेत. अनेक ठिकाणी पिके करपू लागली असून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर लिंबोटी धरणातील उपलब्ध पाणी लाभक्षेत्रात तात्काळ सोडावे, अशी मागणी माजी आमदार तथा शिवसेना शेतकरी परिषदेचे राज्याध्यक्ष शंकर अण्णा धोंडगे यांनी जिल्हाधिकारी आणि जलसंपदा विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शंकरअण्णा धोंडगे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, सध्या लिंबोटी धरणात सुमारे २७ दशलक्ष घनमीटर म्हणजेच ३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. पावसाळा सुरू असल्याने येत्या काही दिवसांत धरण पुन्हा भरण्याची शक्यता असून सध्याच्या उपलब्ध पाण्याचा शेतकऱ्यांच्या हितासाठी वापर करणे आवश्यक आहे. लाभक्षेत्रातील अनेक गावांमध्ये कापूस व हळद पिकांची लागवड करण्यात आली आहे. मात्र पावसाने दडी मारल्यामुळे ही पिके धोक्यात आली आहेत.तसेच मानार प्रकल्पातही मृतसाठ्यापेक्षा सुमारे २४ दशलक्ष घनमीटर (३५ टक्के) पाणी शिल्लक असल्याचे त्यांनी नमूद केले. जुलै महिन्यात होणाऱ्या पावसामुळे धरण पहिल्या टप्प्यात भरण्याची शक्यता असताना सध्या उपलब्ध पाण्याचा उपयोग न झाल्यास तो वाया जाण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांची वाढती अडचण लक्षात घेता जलसंपदा विभागाला तातडीने सूचना देऊन कंधार-लोहा लाभक्षेत्रात पाणी सोडण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी धोंडगे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. यामुळे पिकांना जीवनदान मिळण्याबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न काही प्रमाणात सुटू शकणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, पावसाअभावी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांची बदली

नांदेड/प्रतिनिधी-पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांची पुणे येथे उपायुक्त पदावर बदली करण्यात आली आहे. नांदेडचे नुतन पोलीस अधीक्षक पदी हिंगोलीचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांची शासनाने नियुक्ती केली आहे.



राज्य शासनाने मंगळवारी सायंकाळी राज्यातील काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांची पुणे येथे परिमंडळ उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली. अबिनाशकुमार यांचा दोन वर्षाचा कार्यकाळ ऑगस्ट मध्ये पूर्ण झाला असता. परंतु दोन महिने अगोदरच शासनाने त्यांची बदली केली आहे. अबिनाशकुमार हे नांदेड येथेच अतिरिक्त पोलीस अधीक्षक म्हणूनही कार्यरत होते. त्यानंतर शासनाने त्यांची जिल्हा पोलीस अधीक्षक पदावर बदली केली होती. कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ते ओळखले जात होते. नांदेड जिल्ह्यातील गुन्हेगारीवर आळा घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हिंगोलीचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांची नांदेडच्या जिल्हा पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनानिमित्त नायगावात अभिवादन

नायगाव/प्रतिनिधी- आ.राजेश पवार यांच्या नायगाव येथील जनसंपर्क कार्यालयात भाजपच्यावतीने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनानिमित्त डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी त्यांच्या राष्ट्रनिष्ठ विचारांचे स्मरण करत भारताच्या अखंडतेसाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी उपस्थित वक्त्यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे राष्ट्रहितासाठीचे कार्य, त्यांचे दूरदृष्टीचे नेतृत्व आणि देशाच्या एकात्मतेसाठी दिलेले बलिदान यावर प्रकाश टाकला. त्यांच्या विचारांवर चालत समाजसेवा आणि राष्ट्रसेवा करण्याचा निर्धारही उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष दत्ता पाटील ढगे, राजू पाटील



बेळगे, बळीराम पाटील वडजे, माधव पाटील बेंद्रीकर, गोविंद पाटील हंबर्डे, सुनील पाटील बेंद्रीकर, सचिन पांचाळ, गणेश कंदुरके यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

# सामाजिक न्याय दिनानिमित्त २६ जून रोजी समता दिंडीचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी- संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिन २६ जून हा दिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्याबाबत शासनाचे निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड कार्यालयामार्फत सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात येत आहे.

या निमित्ताने नांदेड जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी, शालेय विद्यार्थी तसेच नागरिकांसाठी दि. २६ जून २०२६ रोजी सकाळी ०८ वाजता राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त समता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. समता दिंडीची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात येईल. दिंडीचा मार्ग महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, स्नेहनगर ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा असा राहणार असून, राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा येथे दिंडीचा समारोप होईल.

महसुल व वन विभाग

**जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड**

**(भूसुधार शाखा)**

गांधी पुतळ्याजवळ,वजिराबाद,नांदेड

जा.क्र.२०२५/साशा-१/भुसू/इनाम/टे-८/कावि-८०२८०७६ दि.२२/६/२०२६

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री.शेख अब्दुल रज्जाक शेख चाँद, रा.नांदेड ता.जि.नांदेड यांनी मौ.म्हळजा ता.जि.नांदेड येथील सर्वे क्र.८/१ क्षेत्र ० हे.०५ आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६ (३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ.म्हळजा ता.जि.नांदेड येथील सर्वे क्र.८/१ क्षेत्र ० हे. ०५ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६ (३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रक्रियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
उपजिल्हाधिकारी (सामान्य)
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ६ वे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.८२९/२०२६

१. शिवाजी पि.किशनराव तावडे वय ६४ वर्ष धंदा शेती नाथनगर, नांदेड ता.जि.नांदेड

विरुध्द

निल

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे. ज्याअर्थी अर्जदार मयत वच्छलाबाई भ्र.किशनराव तावडे यांचे वारस आहेत. मयत वच्छलाबाई भ्र.किशनराव तावडे यांचा मृत्यू दिनांक २८/१२/२०२५ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक ०६/०८/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २३/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरून |
| क.लिपीक | स्वाक्षरित/- |
| ६ वे सह दिवाणी न्यायालय | स.अधिक्षक |
| क.स्तर नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर नांदेड |

# नेर तालुक्यातील ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या निलंबनाचा वाद पेटला

उमरखेड/प्रतिनिधी-नेर तालुक्यातील चार ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे निलंबन विनाअट मागे घेण्यात यावे, तसेच नेरचे तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी, या मागण्यांसाठी विदर्भ पटवारी संघ नागपूर उपविभाग उमरखेडच्या वतीने उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

या पत्रकामुळे महसूल वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. निलंबन विनाअट मागे घेण्याची मागणी विदर्भ पटवारी संघाने दिलेल्या अधिकृत पत्रात नमूद केल्यानुसार, नेर तालुक्यातील चार ग्राम महसूल अधिकाऱ्यांवर करण्यात आलेली निलंबनाची कारवाई अत्यंत अन्यायकारक असून, हे निलंबन कोणत्याही अटीशिवाय तातडीने मागे घेण्यात यावे, अशी आक्रमक भूमिका संघटनेने घेतली आहे. या निवेदनात प्रामुख्याने नेरचे तहसीलदार पुरुषोत्तम भुसारी यांच्या कामकाजावर आक्षेप घेण्यात आला असून, त्यांच्यावर कडक प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासोबतच, ग्राम महसूल अधिकारी संवर्गाच्या बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असलेल्या न्याय्य मागण्या आणि अटी त्वरित पूर्ण कराव्यात, याकडेही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. विदर्भ पटवारी संघ (जिल्हा शाखा यवतमाळ) यांच्या वतीने यापूर्वी १८ जून २०२६ रोजी देखील या संदर्भात निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर आता उपविभाग उमरखेड अंतर्गत २२ जून २०२६ रोजी विदर्भ पटवारी संघाचे अध्यक्ष राजकुमार पी. गरूडे आणि सचिव संजयकुमार एम. धुळे यांच्या स्वाक्षरीने हे पत्र उपविभागीय अधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष सादर करण्यात आले आहे. या मागण्यांवर प्रशासनाने त्वरित सकारात्मक निर्णय न घेतल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महसूल कर्मचाऱ्यांकडून दिला जात आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **DAMKONDWAR RAKESH DIGAMBARRAO** which now I am, changing as (new name) **RAKESH DIGAMBAR DAMKONDWAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**RAKESH DIGAMBAR DAMKONDWAR**
R/o ward no.2, Mulla galli Basweshwar chouk,
Hadgaon Nanded-431712
M.No.-9637656767

CHANGE IN NAME

My (old name) is **DIGAMBARRAO RANGNATH DAMKONDWAR** which now I am, changing as (new name) **DIGAMBAR RANGNATH DAMKONDWAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**DIGAMBAR RANGNATH DAMKONDWAR**
R/o ward no.2, Mulla galli Basweshwar chouk,
Hadgaon Nanded-431712
M.No.-9637656767

# संस्कार भारती तर्फे गुरुवारी भावांजली स्वरमैफील

नांदेड/प्रतिनिधी-स्व.आशा भोसले, स्व.सुमन कल्याणपूर, स्व.पं.चंद्रकांत लिमये व स्व.पं.प्रसाद सावकार यांना गाण्याच्या माध्यमातून भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यासाठी संस्कार भारती नांदेडच्यावतीने दि.२५ जून रोजी सायंकाळी ६ वाजता गिरीराज मंगल कार्यालय काबरानगर रोड येथे होणार आहे.

याप्रसंगी संस्कार भारतीचे अखिल भारतीय संघटन मंत्री दादा गोखले यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. यावेळी पं. संजय जोशी, सौ.अंजली दिक्षीत व कु.चैती दिक्षीत हे गायक कलाकार गाणी सादर करणार आहेत. त्यांना साथ-संगत प्रा.डॉ.जगदीश देशमुख (तबला), मिहीर जोशी (हार्मोनियम), पंकज शिरभाते (व्हायोलिन), भगवानराव देशमुख (सहवाद्य) यांची असेल.

# नांदेड गुरुद्वारा कायदा बदलण्याविषयी पाळलेला संभ्रम चुकीचा:स.रविंद्रसिंघ मोदी

नांदेड/प्रतिनिधी-राज्य सरकारच्या रविवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नांदेड येथील सर्वोच्च धार्मिक संस्था नांदेड शिख गुरुद्वारा तख्त सचखंड बोर्ड कायदा १९५६ रद्द करुन प्रस्तावित नवीन कायदा सचखंड हजुरसाहिब गुरुद्वारा अधिनियम २०२६ लागू करण्यास मंजूरी दिली आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात हा कायदा मंजूर केला जाणार आहे. या कायद्याला शिख समाजाने कडाडून विरोध केला आहे.ज्येष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते स.रविंद्रसिंघ मोदी यांनी सरकारने जुन्या कायद्याविषयी चुकीचा संभ्रम निर्माण करीत असल्याचा आरोप केला आहे. आदरणीय पंजप्यारे साहिबान यांनी देखील शासन निर्णय योग्य नाही म्हणून नवीन कायदा नको आहे अशी भूमीका घेतली आहे.

राज्य सरकारने सन १९५६ चा कायदा रद्द करण्याची दोन प्रमुख कारणं दिली आहेत. एक तर हा कायदा निजामकालीन व जूना आहे. दूसरं हे की, दिवसंदिवस यात्रेकरूँची संख्या वाढत असल्यामुळे प्रबंधनासाठी नवीन कायद्याची गरज आहे. राज्य सरकारने असले विधान करुन संभ्रम पसरविला आहे. दिशाभूल करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. गुरुद्वारा तखत सचखंड बोर्ड कायदा हा सन १९५६ मध्ये सप्टेंबर महिन्यात लागू झाला होता. हैदराबाद संस्थान पण स्वतंत्र भारतात सहभागी झाला होता. नंतर तो कायदा मुंबई स्टेट व पुढे सन १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्र शासनात वर्ग करण्यात आला. त्यावेळी निजामाची राजवट असण्याचे कारणच नव्हते. सन १९४८-४९ मध्ये भारताने हैदराबाद संस्थान विरुद्ध सैनिक करवाही केली होती. समस्त मराठवाड्याला हे इतिहास माहित आहे. सैनिक कारवाही नंतर निजाम शासनाने शरणागती पत्करली आणी समस्त हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. गुरुद्वारा सचखंड बोर्ड कायदा तर १९५६ मध्ये तयार व नोंदणीकृत झाला. तो कायदा निजामकालीन कसा झाला? त्याचे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी द्यावे. दूसरे कारण की भाविकांची संख्या वाढत असल्यामुळे व्यवस्थापण सुधारणे गरजेचे आहे. खरं तर शासनाकडे नांदेडला येणाऱ्या भाविकांच्या उपस्थितिचे कोणतेच संख्यांकी आकडे उपलब्ध नाहीत. गुरुद्वारा बोर्डाकडे देखील संख्याखी आलेख उपलब्ध नाहीत. वर्ष २००८ मध्ये नांदेडला गुरुतागद्दी त्रिशताब्दी सोहळा पार पडला होता. त्यावेळी दोन-दोन विकास योजना राबविण्यात आल्या होत्या आली येत्या ५० वर्षाचे नियोजन करण्यात येत असल्याचे नांदेडच्या शीख समाजाला सांगण्यात आले होते. येणाऱ्या २५ वर्षापर्यंतचे नियोजन नांदेडचा शीख समाज करूँ शकतो. त्यासाठी बाहेर शहरात बसून व्यवस्थापण करणाऱ्यांची गरज वाटत नाही. नांदेडच्या विकासाचे श्रेय लाटणाऱ्या नेत्यांनी येथे स्पष्ट करायला हवे की, जर सध्याचे नियोजन ठीक नाही आहे तर गुरुतागद्दी विकास योजना अपयशी झाली आहे काय?




नांदेडची गुरुद्वारा सचखंड बोर्ड संस्था ही एक तख्त (धर्मपीठ) आहे. त्याच्या प्रबंधनाची काळजी शासनाने करू नये. सध्याचा १९५६ कायदा हा योग्य व सर्वसमावेशक आहे. ज्याच्यात शीख समाजाला राष्ट्रीयस्तरावर प्रतिनिधित्व आहे. नवीन कायदा करण्यासाठी मुंबईच्या काहींची मागणी असल्यामुळे शासन नांदेड व दक्षिण भारतीय शीख समाजावर अन्याय करत आहे. नवीन कायदा लादू नये अशी नांदेडच्या शीख समाजाची मागणी आहे. असे रविंद्रसिंघ मोदी यांनी म्हटले आहे.



जून महिन्याचा शेवटचा आठवडा संपत आला तरीही लोहा तालुक्यात पावसाने दडी दिली आहे. बळीराजाला प्रसन्न करण्यासाठी अंगाला लिंबाचे डहाळे बांधून धोंडी-धोंडी पाणी दे म्हणत वाजत-गाजत देवाला पाणी घालण्यासाठी जातांना नागरिक दिसत आहेत. (छाया : विनोद महाबळे,लोहा)

# वीज कोसळून पंधरा वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू;अन्य दोन मुले गंभीर जखमी

किनवट/प्रतिनिधी-मंगळवार दि.२३ जून रोजी सायंकाळी विजांच्या कडकडाटासह झालेल्या पावसात चिखली बु.शिवारात वीज कोसळून १५ वर्षीय शेख रशीद शेख मुक्रम या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अन्य तिघे जखमी झाल्याची दुर्दैवी दुर्घटना घडली. संबंधित प्रशासनाने पंचनाम्यासह सोपस्कार पूर्ण केल्याचे वृत्त आहे. या दुर्घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्तविलीय.



मंगळवारी दुपारनंतर किनवट तालुक्यात जोरदार हवा आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. दरम्यान चिखली शिवारात शेख रशीद शेख मुक्रम (वय १५) याच्या अंगावर वीज पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. तर शेख अखिद शेख फिरोज (वय १५) व शेख सयान शेख सर्फराज (वय १४) हे गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. प्राथमिक उपचारानंतर त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी आदिलाबाद येथील रुग्णालयात पाठविण्यात आले. दरम्यान शेख अबीद शेख फिरोज (वय १६) हाही जखमी झाला असून त्याच्यावर याच उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच महसूल व आपत्ती व्यवस्थापन प्रशासनातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करून आवश्यक कार्यवाही केल्याचा प्राथमिक अहवाल तहसील कार्यालयामार्फत सादर करण्यात आला आहे.

# भूलजा येथे पिसाळलेल्या कुत्र्याच्या हल्ल्यात अडीच वर्षाच्या मुलीसह तीन जण जखमी

किनवट/प्रतिनिधी-भूलजा गावात पिसाळलेल्या कुत्र्याने दोन दिवसांत एका अडीच वर्षांच्या चिमुकलीसह दोन इसमांचा चावा घेऊन जखमी केले. जखमींना गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले होते. पिसाळलेल्या कुत्र्याचा ग्रामपंचायतीने वेळीच बंदोबस्त करावा अन्यथा आणखी किती लोकांना चावा घेईल सांगता येत नाही.

बोधडी बु. मंडळातील भुलजा हे जेमतेम पाचशे लोकसंख्ये असलेले हे गाव आहे. २२ जून रोजी पिसाळलेल्या एका कुत्र्याने सायंकाळच्या सुमारास गावातील सारनाथ वाठोरे यांची अडीच वर्षांची चिमुकली घरासमोरील अंगणात खेळत असताना अचानक हल्ला करत तिच्या मानेला जबर चावा घेतला. मुलीच्या ओरडण्याचा आवाज ऐकून महिलांनी प्रसंगावधान राखत धावाधाव करून चिमुकलीला कुत्र्याच्या तावडीतून सोडवले. हा थरार एवढ्यावरच थांबला नाही २३ जून रोजीही सकाळी ७ वाजेच्या सुमारास प्रकाश बोंबले हे आपल्या घरासमोर झाडझूड करत असताना, कुत्र्याने बोंबले यांच्या गालाला जबर चावा घेऊन गंभीर जखमी केले. दरम्यान या घटनेनंतर गावातील तरुणांनी लाठ्या-काठ्या घेऊन पिसाळलेल्या कुत्र्याला गावातून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करीत असतांना पुन्हा कुत्र्याने अंबाजी साळवे या इसमावरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला मात्र, साळवे यांनी तात्काळ प्रतिकार केल्यामुळे चावा घेण्याचा प्रसंग टळला. जखमींवर तातडीने गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. पिसाळलेल्या कुत्र्याच्या चाव्यामुळे भूलजा गावातील नागरिकांमध्ये भिंतीचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने अशा पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस पाऊल उचलण्याची मागणी करण्यात आली आहे.

# प्रा.डॉ.मधुकर लहानकर यांना सुश्रुतरत्न जीवन गौरव पुरस्कार प्रदान

नांदेड/प्रतिनिधी-वैद्यकीय शिक्षण, संशोधन, अध्यापन, प्रशासन आणि रुग्णसेवा या सर्वच क्षेत्रांत चार दशकांहून अधिक काळ उल्लेखनीय योगदान देणारे ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ प्रा. डॉ. मधुकर आबासाहेब लहानकर यांना डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या वतीने प्रतिष्ठेचा सुश्रुतरत्न जीवन गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

मुंबई येथील डी. वाय. पाटील स्टेडियम सभागृहात आयोजित भव्य समारंभात विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. वैद्यकीय संशोधन, अध्यापन, प्रशासन, पुस्तक लेखन तसेच नस्य चिकित्सा क्षेत्रातील विशेष कार्यामुळे डॉ. लहानकर यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. प्रा. डॉ. लहानकर यांनी आपल्या कारकिर्दीत १५० हून अधिक संशोधन प्रबंध सादर केले असून अनेक वैद्यकीय ग्रंथांचे लेखनही केले आहे. वैद्यकीय विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देतानाच संशोधनाला चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी



केले. तसेच नस्य चिकित्सा विषयातील त्यांच्या संशोधनाची देश-विदेशात विशेष दखल घेण्यात आली आहे. ते महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचे संस्थापक सदस्य तसेच माजी कुलसचिव म्हणूनही कार्यरत होते. प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी वैद्यकीय शिक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण बनविण्यासाठी मोलाचे योगदान दिले. प्रा. डॉ. मधुकर लहानकर हे नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष संजय लहानकर यांचे ज्येष्ठ बंधू आहेत. त्यांच्या या मानाच्या पुरस्कारामुळे नांदेड जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक व विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# देगलूर तालुक्यातील शिक्षकांच्या रिक्त जागांमुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यात गेले दिड-दोन महिने शांत असणाऱ्या शाळा सोमवारी दि.१५ जून पासून पुन्हा विद्यार्थ्यांच्या किलबिलटाणे सुरू झाल्या आहेत, मात्र अजूनही अनेक शाळेत शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक मंजूर पदे असून सुद्धा यापैकी तालुक्यातील अनेक शाळेमध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्या विषयी पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जाते.

मुलांना शाळेची आवड निर्माण व्हावी व त्यांची उपस्थिती वाढवी, यासाठी नांदेड जिल्हा परिषदेचे शिक्षण विभागाकडून नवनवीन उपक्रम राबविले जाणार आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या वाढावी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी दि. १५ जून सोमवारपासून शिक्षण विभागाकडून शाळेत प्रवेशोत्सवासाठी प्रयत्न केले. विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ ची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना शालेय प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून सोमवारी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा स्वागतासाठी शाळा प्रवेशउत्सव साजरा करण्यात आला. देगलूर तालुक्यातील अनेक शाळा असून यापैकी बरेच शाळेमध्ये जिल्हा परिषद शाळा आहेत. तर अनुदानित शाळा सुद्धा आहेत. या शाळेत शिक्षण घेणाऱ्या पहिली ते आठवी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप केले जाते. यावर्षी मात्र काही वर्गाला काही विषयाची पुस्तके अपुरी असल्याचे समजते. यातील चौथ्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना बालभारती मराठी आणि आपले जग भाग दोन पुस्तक मिळाले नाही. शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसतील तर विद्यार्थी परीक्षा कशा देतील? इयत्ता दहावीच्या बोर्डाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यावर करडी नजर सीसीटीव्ही परीक्षा रूम मध्ये लावून अनेक प्रकारच्या कर्मचाऱ्यांचे लक्ष असते. मात्र शिक्षण विभागाने पात्र शाळेस विद्यार्थ्याकरीता वेगवेगळ्या विषयाचे शिक्षकदेत नाही तसेच विज्ञानाची आवड वाढविण्यासाठी प्रयोगशाळेत साहित्य उपलब्ध आहे का? शिक्षणाचा पहिला पाया मजबूत करण्यासाठी पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना संपूर्ण विषयाची पुस्तके व शिक्षक आहेत काय? वास्तविक पाहता शासनाने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा पाया मजबूत न करता, प्राथमिक शिक्षण कमकुवत बनवत असून बोर्डाची परीक्षा मात्र कॉपी मुक्त घेत आहे. शिक्षण विभागाने कॉपी मुक्त परीक्षा घेत असताना विद्यार्थ्यांना त्याच पद्धतीने सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. वास्तविक पाहता मराठी शाळेची पटसंख्या घटनण्याचे मुख्य कारण म्हणजे मराठी शाळेत सुविधा उपलब्ध नाहीत प्रत्येक विषयाला शिक्षक नाहीत.अन जिथे शिक्षक आहेत ते अशैक्षणिक कामात दंग त्यामुळे इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी संख्या वाढत आहे.

# अखेर प्रतीक्षा संपली!;पावसाच्या सरींनी बळीराजा सुखावला

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद शहरांसह तालुक्यात दि.२२ जून सायंकाळी जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. आज (बुधवार) सकाळपासून ढगाळ वातावरण होते दुपारी पावसाच्या हलक्या सरी पडल्याने पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या या पावसाने शेतकऱ्यांना मात्र मोठा दिलासा दिला आहे.

जून महिना संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्याच्या मनात चिंतेचे सावट होते. वाढत्या तापमानामुळे फळे, भाज्या व ऊस करपण्याच्या स्थितीत पोचले होते. शेतकऱ्याच्या नजरा आकाशाकडे लागल्या होत्या यंदा पाऊस पडेल की नाही? अशी स्थिती निर्माण झाली होती. मात्र सोमवारी सायंकाळी अचानक आकाशात ढगाची गर्दी झाली आणि वादळी वाऱ्यासह पावसाने हजरी लावत बळीराजाच्या आशा पुन्हा जागवल्या. उष्णतेमुळे त्रस्त झालेले पशुपक्ष्यांनाही या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. पावसाच्या सरी बरसताच लहान मुलांनी आनंद व्यक्त करत पावसात भिजण्याचा मनमुराद आनंद लुटला. धर्माबाद परिसरातील शेतकऱ्यांनी या पावसाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले असून आगामी काळातही चांगला पाऊस होऊन खरीप हंगामाला बळ मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या पावसामुळे परिसरातील शेतकरी वर्गात नवचैतन्य निर्माण झाले असून बळीराजाच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा आनंदाचे हास्य फुलले आहे.

पान १ वरुन

## केंद्रीय मंत्रिमंडळात...

यांपैकी एकाची निवड करण्याची वेळ काही नेत्यांवर येऊ शकते, असे मानले जात आहे. गेल्या काही महिन्यांत विविध विरोधी पक्षांतील काही खासदारांनी एनडीएला पाठिंबा दिल्याने त्यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळू शकते, अशी शक्यता व्यक्त होत आहे. आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस तसेच शिंदे गटाशी संबंधित काही खासदारांची नावे संभाव्य दावेदारांमध्ये चर्चेत आहेत. आगामी काळात केंद्र सरकार प्रादेशिक आणि सामाजिक समतोल साधत मंत्रिमंडळाची पुनर्रचना करू शकते, असे संकेत मिळत आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, संसदेतील संख्याबळ अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने भाजप आणि एनडीएकडून रणनीती आखली जात आहे.

पान १ वरुन

## तीर्थक्षेत्र माहूर अंधारात;...

माध्यमातून बाळाला शांत करण्याचा प्रयत्न केला. उकाडा, अंधार आणि गैरसोयींमध्ये भाविकांची होत असलेली ही परवड प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. महावितरण, स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांचा आणि भाविकांचा रोष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. एकीकडे तीर्थक्षेत्र विकासाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात, कोट्यवधी रुपयांच्या निधीची चर्चा होते, तर दुसरीकडे भाविकांना साधी अखंड वीजपुरवठ्याची सुविधा मिळत नाही, ही वस्तुस्थिती लाजिरवाणी आहे. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या माहूरमध्ये अशी परिस्थिती असेल तर दुर्गम भागातील नागरिकांची अवस्था काय असेल, असा सवाल उपस्थित होत आहे.

## स्मार्ट मिटरमुळे वीज दर...

करावा, अशी मागणी त्यांनी केली.यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील सर्व फीडरवर स्मार्ट मीटर प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्याचे सांगत त्यांनी स्पष्ट केले की, यामुळे विजेच्या वापराचे अचूक मोजमाप होणार असून अंदाजावर आधारित बिलिंगची पद्धत संपुष्टात येईल.विविध राज्यांतील वीजदरांचा संदर्भ देताना फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील सरासरी वीजदर सध्या प्रतियुनिट ८.१९ रुपये आहे.

## नरसी फाटा येथे पोलीसांच्या...

व्यापाऱ्यांनी केलेले अतिक्रमण काढण्यात आले. या कारवाईसाठी रामतीर्थ पोलीस स्टेशनसह कुंटूर पोलीस स्टेशन व इतर पोलीस ठाण्यांमधून अतिरिक्त पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला होता. दोन दंगल नियंत्रण पथकांच्या गाड्याही नरसी फाटा येथे तैनात करण्यात आल्या आहेत. पोलिसांच्या उपस्थितीत अतिक्रमण हटविण्याची कारवाई शांततेत सुरू असून, वाहतूक सुरळीत करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अ‍ॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४